पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
dcptfc@mah.gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/१५४५८८५ /२०२४ पिंपरी-चिंचवड दिनांक- १८/११/२०२४

## ☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना ☆

विधानसभा सार्वत्रीक निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड आयुक्तालयांतर्गत विधानसभा निवडणुक मतदान प्रक्रिया दिनांक २०/११/२०२४ रोजी पार पडणार असून दिनांक १९/११/२०२४ रोजी पिंपरी – २०६ विधानसभेच्या मतपेटींचे वाटप हे ॲटोक्लस्टर पिंपरी येथे होणार असून, चिंचवड - २०५ विधानसभेच्या मतपेटीचे वाटप पिंपरी चिंचवड महानगरपालिका कामगार भवन थेरगाव येथे होणार आहे तसेच भोसरी - २०७ विधानसभेच्या मतपेटींचे वाटप हे ईडब्लुएस हॉल घरकुल चिखली येथून होणार आहे. मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर दिनांक २०/११/२०२४ रोजीच रात्री सदर ठिकाणी मतपेट्या जमा करण्यात येणार असल्याने मतपेटी वाटप तसेच मतपेटी जमा करणेची प्रक्रिया सुरळित पार पडणेकरीता सदर तिनही ठिकाणचे वाहतुक मार्गात बदल करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाला आहे त्याअर्थी मी बापू बांगर, पोलीस उप-आयूक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

### वाकड वाहतुक विभाग अंतर्गत

१) तापकीर चौक येथुन थेरगांवकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग:** सदर मार्गावरील वाहने काळेवाडी रोडने काळेवाडी फाटा मार्गे इच्छित स्थळी जातील.

२) काळेवाडी पोलीस स्टेशन येथुन तापकीर चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग:** सदर मार्गावरील वाहने काळेवाडी पोलीस स्टेशन येथुन उजवीकडे वळुन पाण्याची टाकी मार्गे इच्छित स्थळी जातील.

३) माध्यमीक विद्यालय थेरगांव समोरील चौकातून तापकीर चौकाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांस प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग:** सदर मार्गावरील वाहने माध्यमीक विद्यालय थेरगांव समोरील चौकातून उजवीकडे वळुन ग प्रभागच्या रोडने इच्छित स्थळी जातील.

### निगडी वाहतूक विभाग अंतर्गत

१) स्वामी विवेकानंद बोगद्याकडून घरकुल चौक व घरकुल चौक ते कुदळवाडी ब्रिज खालील सर्विस रोड दरम्यानचे सर्विस रोडवरुन सर्व प्रकारच्या वाहनांना ये-जा करण्यास प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग १ :-** सदर मार्गावरील वाहने ही घरकुल चौकाकडून कृष्णानगर चौकाकडे जाणारे मुख्य व सर्विस रस्त्याने येवून कृष्णानगर चौकात येवून कोमल वाईन्स समोरील रोडने इच्छितस्थळी जातील.

**पर्यायी मार्ग २ :-** कोमल वाईन्सचे परिसरात राहणारे लोक वाहतुकीसाठी स्वामी विवेकानंद बोगद्याचा वापर करुन इच्छित स्थळी जातील.

### पिंपरी वाहतूक विभाग अंतर्गत

१) मोरवाडी जुने कोर्ट येथुन ॲटो क्लस्टर मोरवाडी पुणे बसवेश्वर चौकाकडे जाणा-या वाहणास प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग:-** मोरवाडी चौकाकडुन येणारी वाहतुक पुढे सरळ केएसबी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

२) अंबिका वजन काटयापासुन ॲटो क्लस्टर मोरवाडी पुणे बसवेश्वर चौकाकडे जाणा-या वाहणास प्रवेश बंद

Scanned with CamScanner

करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्गः-** मोरवाडीचौकाकडुन येणारी वाहतुक पुढे सरळ केएसबीचौक मार्गे इच्छित स्थळी जातील

३) महात्मा बसवेश्वर चौकाकडुन मोरवाडी जुने कोर्ट येथुन, ॲटो क्लस्टर मोरवाडी पुणे जाणा-या वाहणास **प्रवेश बंद**

**पर्यायी मार्गः-** केएसबी चौकाकडुन व मोहननगर कडुन येणारी वाहतुक पुढे सरळ महावीर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

४) मा आयुक्त बगल्यापासुन ५० मिटर अंतराच्या पुढे ॲटो क्लस्टर मोरवाडी पुणे बसवेश्वर चौकाकडे जाणा-या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्गः-** केएसबी चौकाकडुन येणारी वाहतुक पुढे सरळ जुने कोर्ट मार्गे मोरवाडी चौकातुन इच्छित स्थळी जातील.

तरी वरील प्रमाणे दि.१९/११/२०२४ रोजी पहाटे ०५:०० ते दि.२०/११/२०२४ रोजी ००:०० वा.पर्यंत अथवा मतपेट्या जमा होईपर्यत सर्व प्रकारच्या वाहनांना (अत्यावश्यक सेवेतील पोलीस, अग्निशामक, ॲम्ब्युलन्स तसेच निवडणुक प्रक्रियेत समाविष्ठ असलेली वाहने, वगळून) आवश्यकतेनुसार प्रवेश बंदी करण्यात येत असून अधिसुचना (नोटीफिकेशन) निर्गमित करण्यात येत आहे.

तरी नागरीकांनी नमुद कालावधीत दिलेल्या पर्यायी मार्गाचा वापर करावा

14/11/2024.

(बापू बांगर)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

**प्रति,**

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

**प्रत :**

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी **वाकड, निगडी, पिंपरी** वाहतुक विभाग
/- वाहतूक बदलाचे अनुषंगाने योग्य असे बॅरीकेटीग व बंदोबस्त लावून वाहतुक पर्यायी मार्गाने वळवावी.

Scanned with CamScanner